# प्रेसनोट दि.१७/०१/२०२३

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत दिनांक ०९/०१/२०२३ ते १५/१/२०२३ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे आहेत. सदर क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नागरीकांची संख्याही मोठी असुन त्यांचेमार्फत दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर हा मोठ्या प्रमाणात होत असतो. नागरीक वाहनासंबंधी वाहतुकीचे नियमांचे (फॅन्सी नंबर प्लेट, काळी काच, वगैरे) दिवसेंदिवस उल्लंघन करत असल्याचे दिसुन येत आहे.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो. यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पिंपरी चिंचवड वाहतुक विभागामार्फत दिनांक ९/०१/२०२३ ते १५/१/२०२३ दरम्यान काळी काच (टेंन्टेड ग्लास), फॅन्सी नंबर प्लेट व आरटीओ च्या नियमानुसार नसलेल्या नंबर प्लेट या हेडखाली विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

सदर मोहिमेदरम्यान **काळी काच (टेंन्टेड ग्लास) च्या एकुण २८३१ केसेस करुन २७,४३,७००/- रुपये दंड, फॅन्सी नंबर प्लेट व आरटीओ च्या नियमानुसार नसलेल्या नंबर प्लेटच्या एकुण २०२२ केसेस करुन १२,८७,९००/- रुपये दंड आकारण्यात आला असुन अशा एकुण ४८५३ केसेस करुन एकुण ४०,३१,६००/- एवढा दंड** आकारण्यात आला आहे. यापुढे अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या हेडखाली वाहतुक विभागामार्फत कारवाई करण्यात येणार असल्याने नागरीकांनी वाहतुक नियमांचे पालन करुन पिंपरी चिंचवड पोलीसांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

Scanned with CamScanner